DAY — 22 SEAT NUMBER

2023 | III | 21 | 1500 | J-385 | (M)

# SOCIOLOGY (45)

Time : 3 Hrs. (4 Pages) Max. Marks : 80

*सूचना : (१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.*
*(२) प्रश्नांच्या उजवीकडे पूर्ण गुण दिलेले आहेत.*
*(३) चार गुणांसाठी विचारलेल्या उपप्रश्नांच्या उत्तरांत किमान चार मुद्दे अपेक्षित आहेत.*
*(४) प्रत्येक नवीन प्रश्नाचे उत्तर नवीन पानावर लिहावे.*

**प्र. १.** खालील वस्तुनिष्ठ प्रश्न सोडवा : [२०]

(अ) खालील कंसातील योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व ती पुन्हा लिहा : (५)

(१) भारताच्या संविधानाने ----- भाषांना अधिकृत मान्यता दिली आहे.
[२२, २४, १८]

(२) पंजाबमध्ये --------- यांच्या नेतृत्वात शेतकरी चळवळ उफाळून आली.
[शरद जोशी, राजा महेंद्र प्रताप, सुंदरलाल बहुगुणा]

(३) -------- यांनी 'दीन-ए-इलाही' या नवीन धर्माची स्थापना केली.
[अकबर, औरंगजेब, शहाजहाँ]

(४) बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशीनुसार -------- ची स्थापना करण्यात आली.
[पंचायत राज, सहकारी बँका, ग्राम पंचायत]

(५) शहरी जीवनशैलीचे -------- हे वैशिष्ट्ये आहे.
[सजातीयता, विजातीयता, अनौपचारिकता]

0385

P.T.O

**(ब)** खालील जोड्यांपैकी चुकीची जोडी दुरुस्त करून ती पुन्हा लिहा : (५)

(१) (i) जीवात्मावाद — एडवर्ड टेलर
(ii) चेतनावाद — रॉबर्ट मॅरेट
(iii) कुलप्रतिकवाद — जेम्स फ्रेझर
(iv) निसर्गवाद — लुईस वर्थ

(२) (i) बौद्ध धर्म — बायबल
(ii) इस्लाम धर्म — कुराण
(iii) हिंदू धर्म — भगवद्गीता
(iv) पारसी धर्म — अवेस्ता

(३) (i) भाषेवर आधारित संघर्ष — भाषावाद
(ii) धर्मावर आधारित संघर्ष — दहशतवाद
(iii) जातीवर आधारित संघर्ष — जातीयवाद
(iv) प्रदेशावर आधारित संघर्ष — प्रदेशवाद

(४) (i) चिपको आंदोलन — सुंदरलाल बहुगुणा
(ii) नर्मदा बचाओ आंदोलन — सिंधुताई सपकाळ
(iii) भारत छोडो आंदोलन — महात्मा गांधी
(iv) शेतकरी आंदोलन — शरद जोशी

(५) (i) सती प्रतिबंधक कायदा — १९४२
(ii) विधवा पुनर्विवाह कायदा — १८५६
(iii) स्त्री भ्रूणहत्या (निवारण) कायदा — १८७०
(iv) स्पेशल मॅरेज कायदा — १९५४

**(क)** चौकटीत दिलेल्या पर्यायांतून योग्य संज्ञा ओळखून ती दिलेल्या विधानापुढे लिहा : (५)

| धर्म, निवृत्ती वेतन, सोळासती, अंकीकृतकरण, शिस्तबद्ध सैनिक |
|---|

(१) FYJC च्या प्रवेशासाठी महानगरांमधील संगणकीय प्रणालीद्वारे होणाऱ्या प्रक्रिया.
(२) काही जेष्ठ नागरिकांच्या गरजा भागविण्याचे साधन.
(३) जैन धर्मातील स्त्रियांसाठी आदर्शवत व अनुकरणीय.
(४) भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील महिलांचे संबोधन.
(५) फळाची आशा न धरता निरपेक्षवृत्तीने विहित कर्म करीत राहणे.

**(ड) अधोरेखित शब्द दुरुस्त करून विधाने पुन्हा लिहा :** (५)

**(१) जन्म-मृत्यूच्या फेऱ्यातून सुटका मिळवण्याचे <u>धर्म</u> हे आयुष्यातील परमोच्च ध्येय होय.**

(२) शीख धर्मात सार्वजनिक स्वयंपाकघराला पंजाबी भाषेमध्ये पंगत म्हणतात.

(३) शहरीकरण ही अनुकरणाची प्रक्रिया आहे.

(४) २००२ मध्ये निर्भया बलात्कार प्रकरण घडले.

(५) 'बेल बजाओ आंदोलन' व्यसनाधिनतेच्या विरोधातले आहे.

**प्र. २. खालीलपैकी विषयांवर संक्षिप्त टिपा लिहा ( कोणत्याही दोन ) :** [८]

(१) शहरी समुदायाची वैशिष्ट्ये

(२) औद्योगिकीकरणाचे परिणाम

(३) आंतरजालाचे व्यसन

**प्र. ३. खालीलपैकी फरक स्पष्ट करा (कोणतेही तीन) :** [१२]

(१) आदिवासी समुदाय आणि ग्रामीण समुदाय

(२) पूर्व वैदिक काळातील स्त्रियांचा दर्जा आणि उत्तर वैदिक काळातील स्त्रियांचा दर्जा

(३) संप्रदायवाद आणि धर्मनिरपेक्षता

(४) औद्योगिकीकरण आणि शहरीकरण

(५) वैयक्तिक समस्या आणि सामाजिक समस्या


**प्र. ४. खाली दिलेल्या संकल्पना उदाहरणासह स्पष्ट करा ( कोणतेही दोन ) :** [८]

(१) ग्रामीण समुदाय https://www.maharashtrastudy.com

(२) राष्ट्रीय एकात्मता

(३) बेरोजगारी (बेकारी)

**प्र. ५. (अ)** खालील संकल्पना चित्र पूर्ण करा : (४) [१२]




**(ब)** खालील विधाने बरोबर की चूक हे सांगून सकारण स्पष्ट करा ( कोणतेही दोन): (८)

(१) आदिवासी समुदायाची अर्थव्यवस्था साधी आहे.

(२) आर्थिक विषमतेचा समाजावर परिणाम होत नाही.

(३) एखादया व्यक्तीची वेशभूषेची पद्धती तिच्या आधुनिकतेची उंची ठरवते.

प्र. ६. (अ) खालील उतारा वाचून त्या खालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : (६) [१०]

सामाजिक समस्यांचा सामना कसा करायचा? समाजातील सामाजिक समस्यांचा सामना करण्यासाठी नेमके काय केले जाते? सामाजिक समस्या निर्माण कशा होतात? समाजशास्त्राच्या अभ्यासकांनी अशा काही प्रश्नांची उत्तरे शोधणे अपेक्षित असते.

प्रत्येक समाजाची एक विशिष्ट संस्कृती असते; समाज आणि संस्कृती दोन्हीही मानवनिर्मित असते. हजारो वर्षांच्या मानवी संबंधातून संस्कृती आणि समाज आकारास येतो. प्रत्येक समाजाची एक नियामक व्यवस्था असते. प्रथा, रूढी, चालीरीती, लोकगीत, निषिद्ध बाबी, टूम, गद्य, कायदे इत्यादींचा त्यात समावेश होतो. सामाजिक नियम म्हणजे मानवी वर्तनाची मार्गदर्शक तत्त्वे होत. समाजात **वावरताना आपल्याकडून काय अपेक्षित आहे आणि इतरांकडून काय अपेक्षा करायची ते या नियमांमुळे स्पष्ट होते.**

या अपेक्षा कायमस्वरूपी असतात की त्यांचे स्वरूप न बदलणारे असते? अपेक्षा कधी बदलू शकतात? त्या कोण बदलते? त्यांमध्ये बदल होणे आवश्यक का आहे? असे प्रश्न कुणालाही पडू शकतात. अशा अपेक्षा परिणामकारक पद्धतीने इतरांपर्यंत पोहोचवल्या जात नाहीत किंवा व्यक्ती अथवा गटांना या अपेक्षा अमान्य असतात तेव्हा सामाजिक समस्या निर्माण होतात. यामुळे संघर्षाची परिस्थिती निर्माण होऊ शकते. केवळ विचारांचा संघर्ष नव्हे, तर अशा संघर्षातून इतरांच्या भावना दुखावल्या जाऊ शकतात. अत्याचार, हिंसा आणि अन्यायाला खतपाणी मिळते. यामुळे समाजामध्ये उलथापलथ होऊ शकते, अनागोंदीची परिस्थिती निर्माण होऊ शकते किंवा युद्धाचीही परिस्थिती निर्माण होऊ शकते.

**(१) सामाजिक नियमने तुमच्या वर्तनास कसे मार्गदर्शन करतात?**

**(२) "संस्कृतीतील भेदांमुळे संघर्ष उंद्भवतो" या विधानाचे समर्थन करा.**

(ब) आपले व्यक्तिगत मत नोंदवा (कोणतेही एक) : (४)

(१) ग्रामीण लोक शहरांकडे स्थलांतर करणे पसंत करतात.

(२) शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत.

**प्र. ७. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे सविस्तर उत्तर १५० ते २०० शब्दांमध्ये लिहा :** [१०]

(१) तुम्ही अभ्यासलेल्या पर्यावरणीय चळवळींची कोणतीही पाच कारणे व त्यांचे परिणाम यांची चर्चा करा.

(२) खालील दोन घटकांमुळे भारतीय समाजात कसे परिवर्तन घडून आले याची सोदाहरण चर्चा करा

(१) शिक्षण (२) वाहतूक व संप्रेषण (दळणवळण)

◆◆◆